# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २४/०८/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते व बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

कोकण विभागात काही ठिकाणी तर कोल्हापूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. नागपूर विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाचा पाऊस झाला.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि.१ जून ते २४ ऑगस्ट कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ७५९.९ मि.मी. असून दि.२४ ऑगस्ट, २०२० पर्यंत ८२६.१ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०८.७१ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२४.०८.२०१९ अखेर ८५४.२ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११२.४१ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते २४ ऑगस्ट, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ०१ | नंदुरबार. |
| ४ | ७५ ते १०० % | १४ | रायगड, ठाणे, नाशिक, पुणे, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, अकोला, अमरावती,यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १९ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद, जालना, बीड, हिंगोली, परभणी, बुलढाणा, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया. |

राज्यात २४ ऑगस्ट, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी २तालूक्यांत २५ ते ५० %, २६ तालूक्यात ५० ते ७५ %, ९६ तालूक्यात ७५ ते १००% तर २३१ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**पर्जन्यमान तपशिल (मि.मी) दि. २४.०८.२०२० अखेर**



**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळी खोडकिड, निळे भुंगेरे या किडींचा, सोयाबीन पिकावर हेलिकोव्हर्पा, गर्डल बीटल, खोडमाशी, उंट अळी व तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा तर ऊस पिकावर लष्करी अळी व हुमणी या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

किड व रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतीशाळा, कृषि विद्यापीठाकडील पिक संरक्षण सल्ले, **पिक** सर्वेक्षणासाठी योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा, गांव बैठका, घडी पत्रिका वाटप, बाधित क्षेत्रास तज्ञांच्या भेटी इत्यादी माध्यमातून उपाययोजना करण्यात येत असून, किड नियंत्रणासाठी आजपावेतो विविध योजनांच्या माध्यमातून एकूण-४५,२११ लीटर किटकनाशकांचा पुरवठा करण्यात आला आहे. या अनुषंगाने प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे.

दि.२१.०८.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार जुलै व ऑगस्ट, २०२० मधील नैसर्गिक आपत्तीमुळे (अतिवृष्टीमुळे) शेतपिके/फळपिकांचे बुलढाणा, हिंगोली, जळगाव, नागपूर, अकोला व सातारा जिल्हयातील अनुक्रमे १४,६०० हे.,१०,०७३ हे., ३०३ हे., ३१४ हे., ७०४२ हे., व ५ हे. असे एकूण-३२,३३७ हे. क्षेत्र बाधित झाले असून, यामध्ये ज्वारी, बाजरी, मका, तूर, भात, मूग, उडीद, हळद, सोयाबीन, कापूस, मोसंबी, संत्रा, केळी, भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे. तसेच अमरावती जिल्हयातील दर्यापूर तालुक्यात मूग पिकावर मोझॅक विषाणुच्या प्रादुर्भावामुळे १३, ३३० हे. क्षेत्र बाधित झाले आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९९ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर १४०.५४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८.९८%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३४ लाख हेक्टर असून १४१.७९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९३.६९%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.२३.०८.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १३६.९२ लाख हे. (९०.४७%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १३५.९० लाख हे. (९५.७१%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात खरीप पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. भात व नागली पिकांची रोवणी प्रगतीपथावर असून, पिके वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहेत. बाजरी पिक पोटरी ते फुलोरा तर काही ठिकाणी दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. मूग व उडिद पिके फुलोरा ते शेंगा भरणेच्या तर काही ठिकाणी शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी सुरु आहे. सोयाबीन व भुईमूग पिके फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते धरणे ते फुले लागणे तर काही ठिकाणी बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी, तूर व सुर्यफुल पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची (निंदणीची/कोळपणीची) कामे सुरू आहेत.

## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.२४.०८.२०२० अखेर)




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह) (क्षेत्र लाख हे.)



**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. आद्रतेच्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर ३.७० लाख हेक्टर क्षेत्रावर (८३.७८%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी भात पिक लावणीची कामे अंतिम टप्प्यात आहे. नाचणी पिकाच्या पुर्नलागवडीची कामे पुर्णत्वाकडे आहेत. भात पिक वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक वाढीच्या अवस्थेत आहे. याशिवाय तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे पुर्ण होत आली असून, पेरणी झालेली कडधान्ये व तेलबिया पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड, केसाळ अळी, निळे भुंगेरे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नाशिक विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवामान दमट होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर १९.८२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९३.५५%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नागली पिकांची पुर्नलागवड पुर्ण होत आली आहे. ज्वारी, सुर्यफुल व कारळा पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. बाजरी पिक पोटरीच्या अवस्थेत आहे. मका पिक तुरे लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहेत. मूग व उडीद पिके शेंगा लागणे ते दाणे भरणे तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहेत. भुईमूग पिक फुले ते आऱ्या लागणेच्या अवस्थेत आहेत. बागायती कापूस फुले लागणे ते बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहे. जिरायती कापूस फुले ते पाते लागण्याच्या अवस्थेत आहे. आडसाली ऊसाची लागवड अंतिम टप्प्यात आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत. जळगांव जिल्हयात काही ठिकाणी मूग व उडीद पिकांना पावसामुळे कोंब येण्यास सुरुवात झाली आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा, भात पिकावर निळे भुंगेरे या किडीचा तर मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर ११.९१ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३७.३५%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी व मका पिके दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत. भात पुर्नलागवडीची कामे झाली आहेत. तूर पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. भुईमूग व सोयाबिन पिके फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहेत. मुग व उडीद पिके शेंगा भरणेच्या तर काही ठिकाणी काढणीच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते ते फुले लागणेच्या अवस्थेत आहे. अडसाली ऊस पिकाची लागवड सुरु आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत. काही ठिकाणी सततच्या पावसामुळे कापूस, मूग, सोयाबीन पिके पिवळी पडत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर हेलीकोव्हर्पा, गर्डल बीटल, खोडमाशी व उंट अळी, ऊस पिकावर हुमणी या किडींचा, कापूस पिकावर अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. अहमदनगर जिल्हयात मूग पिकावर विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तपमानात वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१४ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर ७.९७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.८८%) पेरणी झाली आहे. विभागात पिकांच्या पेरण्या जवळपास पुर्ण झाल्या आहेत. भात व रागी पिकांची रोवणी पुर्णत्वाकडे असून, पिके वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढ ते तुरा बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक वाढ, फुलोरा ते शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिके फुलोरा ते शेंगा भरणेच्या तर काही ठिकाणी शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत. भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटण्याच्या अवस्थेत आहेत. नवीन अडसाली ऊसाची लावणी चालू आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची व खते देण्याची कामे चालू आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर ऊंट अळी या किडींचा, भुईमूग पिकावर हुमणीचा, मूग पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, ऊस पिकावर लोकरी मावा या किडीचा तर सोयाबीन पिकावर तांबेरा, भात पिकावर करपा व भुईमूग पिकावर टिक्का या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर २०.२३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.०१%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी पिक फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे. उडीद व मूग पिके शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते, फुले ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक फुले लागणे ते आऱ्या सुटण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू असून पिक संरक्षणासाठी कृषि विभागामार्फत उपाययोजना सुचविण्यात येत आहेत. काही ठिकाणी पावसामुळे मूग पिकास कोंब येऊन गुणवत्तेवर परिणाम होत आहे व साचलेल्या पाण्यामुळे पिके पिवळी पडत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर ऊंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा, उडीद पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवसाचे व रात्रीचे तापमान कमी होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर २८.२० लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.९४%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी व बाजरी पिके वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहेत. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहेत. मका पिक फुलोरा तर काही ठिकाणी कणसे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिके फुलोरा, शेंगा लागणेच्या तर काही ठिकाणी शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत. तूर पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू असून, पिकांची वाढ समाधानकारक आहे. काही ठिकाणी पावसामुळे मूग पिकास कोंब येऊन गुणवत्तेवर परिणाम होत आहे व साचलेल्या पाण्यामुळे पिके पिवळी पडत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, हेलीकोव्हर्पा, उंट अळी, गर्डल बीटल आणि खोडमाशीचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, ऊस पिकावर लष्करी अळी तर कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे प्रमाण वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.१३ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर ३०.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.३४%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस पिक पाते, फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिके शेंगा धरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत. काही ठिकाणी पावसामुळे मूग पिकास कोंब येऊन गुणवत्तेवर परिणाम होत आहे व साचलेल्या पाण्यामुळे पिके पिवळी पडत आहेत. विभागात काही ठिकाणी पावसामुळे मूग व उडीद पिकास कोंब येत आहेत. तसेच सोयाबीन पिकाची पाने पिवळी पडत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर मावा तुडतुडे, अमेरीकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला. **काही ठिकाणी मूग पिकावर विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.**

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते.तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.२४ ऑगस्ट, २०२० अखेर १८.०७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९३.८१%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिकाच्या रोवणीची कामे प्रगतीपथावर आहेत. भात पिक वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते, फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत तर मका पिक फुलोरा ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा, भात पिकावर पिवळी खोड किड, निळे भुंगेरे या किडीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, उंट अळी, खोडमाशी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. २४.०८.२०२० पर्यंत पेरणी अहवाल

क्षेत्र- हेक्टरमध्ये

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.२३/०८/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १५०३११९ | १३००७५५ | १३६५८७८ | ९१ | १०५ | ५ |
| २ | खरीप ज्वारी | ४८३२२८ | २७८७९७ | २७३३९० | ५७ | ९८ | -२ |
| ३ | बाजरी | ६७१५९४ | ६३९१४४ | ६३४२३० | ९४ | ९९ | -१ |
| ४ | रागी | ९५५१० | ६६३६८ | ६१९८३ | ६५ | ९३ | -७ |
| ५ | मका | ८३८४७५ | ८४४२२८ | ८६७७६० | १०३ | १०३ | ३ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६५ | २९६७३ | २९५७९ | ५६ | १०० | ० |
| **खरीप तृणधान्य** | | **३६४४५९१** | **३१५८९६४** | **३२३२८२०** | **८९** | **१०२** | **२** |
| ७ | तूर | १२७४५७६ | १२०५१८३ | १२३२४२१ | ९७ | १०२ | २ |
| ८ | मुग | ४८३६२५ | ३२२२८५ | ३८७७३३ | ८० | १२० | २० |
| ९ | उडिद | ३५९१५३ | २८७४८० | ३८०५९३ | १०६ | १३२ | ३२ |
| १० | इतर कडधान्य | १००३४९ | ८४१३७ | ११७२५२ | ११७ | १३९ | ३९ |
| **एकुण कडधान्य** | | **२२१७७०४** | **१८९९०८५** | **२११७९९९** | **९६** | **११२** | **१२** |
| **एकुण अन्नधान्य** | | **५८६२२९४** | **५०५८०४९** | **५३५०८१९** | **९१** | **१०६** | **६** |
| ११ | भुईमुग | २०२२९८ | १८३०२८ | १९८४८३ | ९८ | १०८ | ८ |
| १२ | तीळ | २३६८६ | १०६७८ | ८३६२ | ३५ | ७८ | -२२ |
| १३ | कारळ | १९८२७ | ६६६० | ६७०७ | ३४ | १०१ | १ |
| १४ | सुर्यफुल | १७९८० | १२५१७ | १४४५७ | ८० | ११५ | १५ |
| १५ | सोयाबीन | ३८८०२४४ | ३९४६५९१ | ४२६९०६६ | ११० | १०८ | ८ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८४६ | ४६२९ | ४६२९ | ३३ | १०० | ० |
| **एकुण तेलबिया** | | **४१५७८८२** | **४१६४१०३** | **४५०१७०४** | **१०८** | **१०८** | **८** |
| **१७** | **कापुस** | **४१७८४११** | **४३६८१८२** | **४२०१६४७** | **१०१** | **९६** | **-४** |
| **एकुण पेरणी क्षेत्र** | | **१४१९८५८८** | **१३५९०३३५** | **१४०५४१७१** | **९८.९८** | **१०३** | **३** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **१०१६८८** | **१२४६६८** | **१३** | **१२३** | **२३** |
| **एकुण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३३७६७** | **१३६९२०२२** | **१४१७८८३८** | **९३.६९** | **१०४** | **४** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत